**महाराष्ट्र शासन**

ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन,

२५, मर्झबान पथ,फोर्ट , मुंबई - ४०० ००१

usest7.rdd-mh@gov.in    दूरध्वनी क्र.०२२-२२०१३७८१


---

क्र. संकीर्ण-२०२३/प्र.क्र.२८५/आस्था-७    दिनांक :- ११ ऑगस्ट, २०२३

प्रति,
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद (सर्व)

**विषय:- अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या परंतु अधिसंख्य न केलेल्या कर्मचाऱ्यांना/वारसांना सेवा निवृत्ती/निवृत्तीवेतन/ कुटूंब निवृत्तीवेतन वेतनाचे लाभ देणे बाबत.**

**संदर्भ:**-१. उप आयुक्त (आस्थापना), विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण विभाग, यांचे पत्र क्र.विकास/कार्य-२/पेन्शन/कावि/ ४७७२/२०२३/५९६, दि. १३.३.२०२३

२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. औरंगाबाद यांचे पत्र क्र.जिपऔ/ आरोग्य/आस्था-२ब/कावि/१६४/२०२३/५६०, दि.२३.०२.२०२३

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.जालना यांचे पत्र क्र.जिपजा/साप्रवि/ प्रशा-५/सेनिवे/कावि/२०२३/१२४९,दि. १२.०४.२०२३

महोदय,

संदर्भाधीन पत्रान्वये जिल्हा परिषदांकडील जे कर्मचारी जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करु शकले नाहीत. तसेच जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे प्रकरण प्रलंबित आहेत असे कर्मचारी अधिसंख्य पदावर वर्ग न होताच सेवानिवृत्त झालेले/मूत्यू झाले आहेत अथवा सेवानिवृत्त होणार आहेत. तसेच ज्या कर्मचाऱ्यांचे जात प्रमाणपत्र समितीने रद्द करुन जप्त केले आहे अशा कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीचे/कुटूंब निवृत्तीवेतनाचे लाभ देता येतील किंवा कसे याबाबत शासनाकडे मार्गदर्शन मागितले आहे. त्यानुसार सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय यांचे मागदर्शन घेण्यात आले असून खालील प्रमाणे अभिप्राय दिलेले आहेत.

"अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र अवैध ठरल्यामुळे अधिसंख्य पदावर वर्ग केलेल्या कर्मचाऱ्यांना सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दि. १४.१२.२०२२ मधील तरतूदीनुसार पदोन्नती व अनुकंपा धोरण वगळता सेवा विषयक व सेवानिवृत्ती विषयक सर्व लाभ अनुज्ञेय आहेत.

तथापि, जात प्रमाणपत्र अवैध ठरविण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीविषयक तसेच इतर अनुषंगिक लाभ देण्याबाबत निर्णय घेण्याकरीता मा.मंत्रीमंडळासमोर प्रस्ताव सादर करण्याची

कार्यवाही करण्यात येत आहे. मा. मंत्रीमंडळाच्या बैठकीत निर्णय झाल्यानंतर त्यानुसार शासन निर्णय निर्गमित करण्यात येईल."

३. तरी तूर्तास वरील अभिप्रायानुसार कार्यवाही करण्यात यावी.

आपला,

(डॉ. प्र.सु.गांगुर्डे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. निवडनस्ती आस्था-७